देशोन्नती

# सामाजिक न्याय विभागाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचवा

## ॲड. धर्मपाल मेश्राम यांचे निर्देश

देशोन्नती वृत्तसंकलन

**नागपूर :** सामाजिक न्याय विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना भारतीय राज्यघटनेतील तरतूदीनुसार साकारलेल्या आहेत. राज्यातील दुर्बलतर जनवर्ग आणि विशेषतः अनुसूचित जाती, जमाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील अशी हमी भारतीय संविधानाने दिलेली आहे. या हमीची तेवढीच काळजी घेऊन सामाजिक न्याय विभागाच्या योजना या गरजू लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचविण्याची खबरदारी विविध विभाग प्रमुखांनी घ्यावी, असे निर्देश राज्य अनुसूचित जाती, जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी दिले.

सामाजिक न्याय विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची आढावा बैठक बुधवारी त्यांच्या अध्यक्षतेखाली सहायक आयुक्त कार्यालयात संपन्न झाली. यावेळी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त मंगेश वानखेडे, सामाजिक न्याय विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, नगर प्रशासन विभागाचे विनोद जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक उपस्थित होते. लाभार्थ्यांची निवड करताना पात्र व गरजू लाभार्थ्यांना प्राधान्य दिले पाहिजे. गरजू लाभार्थी हे खऱ्या अर्थाने योजनांचे जे ध्येय निश्चित केलेले असते ते साध्य करुन दाखवितात. दुर्बल व्यक्तीला विकासाच्या प्रवाहात आणण्याची जबाबदारी आपण स्विकारलेली आहे. विभाग प्रमुख म्हणून या जबाबदारीची काटेकोरपणे अंमलबजावणी आपल्याकडून झाली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. दुर्गम भागातील लहान खेड्यापासून महानगरात वास्तव्यास असलेल्या पात्र लाभार्थ्यांसाठी आपण योजना उपलब्ध केल्या आहेत. यासाठी पुरेसा निधीही उपलब्ध करुन दिला आहे. प्राथमिक शिक्षणापासून स्वयंरोजगारापर्यंत, पोषण आहारापासून सर्वांच्या आरोग्यापर्यंत एक व्यापक दृष्टीकोण योजनांची रचना करताना ठेवण्यात आलेला आहे. शासनाच्या या भूमिकेला समजून अधिकाऱ्यांनी योजना राबवितांना योग्य ती दक्षता घेण्यासही त्यांनी सांगितले.